**जागतिक पुस्तक दिन** • सुसज्ज वाचनालयात मुलांना अभ्यास, संदर्भासाठी जगभरातील सर्व पुस्तके उपलब्ध

# ‘आयआयएम’च्या वाचनालयात एका क्लिकवर पुस्तके

**प्रतिनिधी** | नागपूर

भारतीय व्यवस्थापन संस्थान म्हणजेच आयआयएमच्या सुसज्ज वाचनालयातील मुलांना अभ्यास आणि संदर्भासाठी जगभरातील सर्व पुस्तके उपलब्ध आहेत. केस स्टडी, जर्नल्स, सांख्यिकी डेटाबेस, वर्तमानपत्रे आणि मासिके आणि हार्वर्ड बिझनेस स्कूल प्रकाशन, एसएजीई, टेलर आणि फ्रान्सिस, एमराल्ड, इबस्को यांसारख्या जगप्रसिद्ध प्रकाशकांकडून ऑडिओ-व्हिज्युअल सामग्रीपर्यंतची विविध माहिती येथे उपलब्ध असल्याची माहिती मुख्य जनसंपर्क अधिकारी अनघा रानडे यांनी दिली.

आयआयएम नागपूर ई-लायब्ररी पोर्टलद्वारे विद्यार्थी आणि प्राध्यापक त्यांच्या लॅपटॉप आणि मोबाइलवर कोठेही एका क्लिकवर सर्व पुस्तके आणि संदर्भ मिळवू शकतात. आयआयएम नागपूरकडे फायनान्शियल टाईम्स, वॉल स्ट्रीट जर्नल आणि द इकॉनॉमिस्ट यांसारख्या जागतिक वृत्तपत्रांची सदस्यता देखील आहे. आयआयएम नागपूर लायब्ररी पूर्णपणे स्वयंचलित आहे. सर्व लायब्ररी सेवा माहिती तंत्रज्ञान आधारित आहेत. प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांना त्यांच्या संशोधन आणि अभ्यासक्रमामध्ये मदत करण्यासाठी प्रशिक्षित कर्मचारी उपलब्ध आहेत. या व्यतिरिक्त, येथे संगणक प्रयोगशाळा आणि वाचन सभागृह आहे.

**राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांचा**



आयआयएमच्या वाचनालयातील स्वामी विवेकानंदांची प्रतिमा.

**दौरा रद्द, मात्र दीक्षांत समारंभ उद्या** : राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांचा शनिवार २३ एप्रिलचा प्रस्तावित नागपूर दौरा रद्द झाला आहे. काही अपरिहार्य कारणांमुळे हा दौरा रद्द झाल्याचे पत्र राष्ट्रपती भवनाने गुरुवारी प्रसिध्दी माध्यमांकडे पाठवले. आता ८ मे रोजी राष्ट्रपती नागपुरात येणार आहे. राष्ट्रपती २३ एप्रिलला नागपूरच्या दौऱ्यावर येणार होते. राष्ट्रपतींचा दौरा रद्द झाला तरी २४ रोजी दीक्षांत समारंभ होणार असल्याची माहिती आयआयएमचे संचालक डॉ. भीमराया मैत्री यांनी पत्रपरिषदेत दिली. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी व धर्मेंद्र प्रधान, राज्यपाल भगतसिंह कोश्यारी, विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री नितीन राऊत आदी उपस्थित राहाणार असल्याचे मैत्री यांनी सांगितले. २०१८-२०, २०१९-२१ व २०२०-२२ या तीन वर्षातील ४२४ विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात येईल. असे अध्यक्ष सी. पी. गुरनानी यांनी सांगितले.

## जपानी प्रकल्पाशी भागीदारी

आयआयएम नागपूर लायब्ररी अधिकृतपणे रीड जपान प्रकल्पाची भागीदार आहे. जपान आणि इतर देशांमधील सांस्कृतिक संबंधांना प्रोत्साहन देणारा हा एक प्रतिष्ठित प्रकल्प आहे. या प्रकल्पांतर्गत आयआयएम नागपूर लायब्ररीला जपानी संस्कृती आणि इतिहास, सामाजिक विज्ञान आणि व्यवसाय व्यवस्थापन विषयांशी संबंधित पुस्तके नियमितपणे मिळतात.